मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART)
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि
साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे-४११००५
फोन नं.०२०-२५५३६०१०, ई-मेल-smart.piuagri@gmail.com

जा.क्र./स्मार्ट/आत्मा/VCDS/मा.सु./३२१ /२०२२ दि. २३/०५/२०२२

प्रति,

१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
२) प्रकल्प संचालक, आत्मा, सर्व

विषय:- स्मार्ट प्रकल्पांतर्गत मुल्यसाखळी विकास शाळा (VCDS) सुधारीत मार्गदर्शक सुचना सन २०२२-२३ नुसार अंमलबजावणी करणेबाबत...

संदर्भ :- मुल्यसाखळी विकास शाळा मार्गदर्शक सुचना जा.क्र.संचा.आत्मा/स्मार्ट/मु.वि.शा./मा.सु./३१४/२०२० दिनांक १९.०५.२०२०

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत मुल्यसाखळी विकास शाळा (VCDS) अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सुचना संदर्भानुसार निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. परंतू सदरच्या मार्गदर्शक सुचना अधिक्रमीत करुन सोबत जोडलेल्या सुधारीत मार्गदर्शक सुचनानुसार मुल्यसाखळी विकास शाळेच्या घटकांची अंमलबजावणी वेळेत करण्याची दक्षता घेण्यात यावी.

सोबत :- सुधारीत मार्गदर्शक सुचना सन २०२२-२३

(दशरथ तांभाळे)
प्रमुख,पीआययू (कृषि),स्मार्ट
तथा कृषि संचालक, आत्मा
कृषि आयुक्तालय,पुणे

प्रत :- सर्व नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा,स्मार्ट यांना माहिती व कार्यवाहीस्तव

**मुल्यसाखळी विकास शाळा अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना २०२२-२३**
**Value Chain Development School (VCDS)**

१) स्मार्ट प्रकल्पाची प्रस्तावना :-

जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्यातून राबविण्यात येत असलेल्या मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिर्वतन (SMART) स्मार्ट प्रकल्पाचे उद्दीष्ट खालीलप्रमाणे आहे.

"राज्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषि उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्वसमावेशक कृषि मुल्यसाखळया विकसीत करणे"

प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उत्पादक आणि उद्योजकांना नवीन व संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा आणि जोखीम निवारण क्षमता विकसित करण्यासाठी प्रकल्पामार्फत गुंतवणूक केली जाईल.

२) **प्रकल्पाचे घटक** - प्रकल्पाचे प्रमुख चार घटक खालीलप्रमाणे आहेत -

अ) **कृषि व्यवसाय सुधारणांसाठी संस्थात्मक व्यवस्थेचे बळकटीकरण**
ब) **शेतक-यांना बाजाराच्या संधी मध्ये वाढ करणे आणि कृषि व्यवसाय वृध्दीसाठी सहाय्य**
क) **जोखीम निवारणाची व्यवस्था उभी करणे**
ड) **प्रकल्प व्यवस्थापन**

अ) **कृषि व्यवसाय सुधारणांसाठी संस्थात्मक व्यवस्थेचे बळकटीकरण :** - या घटकांतर्गत कृषि व पणन विभागाचे बळकटीकरण करणे, या विभागातील कर्मचारी/अधिकाऱ्यांची क्षमताबांधणी करणे (प्रशिक्षण), पिकनिहाय मुल्यसाखळी विकास हितसंवर्धन परिषदांची स्थापना करणे इ. बाबींचा समावेश आहे.

ब) **शेतक-यांना बाजाराच्या संधी मध्ये वाढ करणे आणि कृषि व्यवसाय वृध्दीसाठी सहाय्य:-** या घटकांतर्गत मुल्यसाखळी विकासाचे गटशेती पध्दतीचे परंतु शेतक-यांच्या नोंदणीकृत समुदाय आधारीत संस्थांसाठी (CBO) उपप्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या उपप्रकल्पांना प्रकल्प खर्चाच्या ६०% पर्यंत अनुदान देण्यात येईल. या उपप्रकल्पाचे लाभार्थी समुदाय आधारीत संस्था (Community Based Organization- CBO) असतील. उदः शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC), महाराष्ट्र ग्राम जीवनोन्नती अभियानांतर्गत (MSRLM) स्थापित प्रभाग संघ (Cluster Level Federation- CLF), महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत स्थापित लोक संचलित साधन केंद्र (Community Managed Resource Centre - CMRC), विविध कार्यकारी प्राथमिक कृषि पतसंस्था (Primary Agriculture Cooperative Society - PACS).

मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. :-

i) **उत्पादक भागीदारी उपप्रकल्प** (Productive Partnerships-PP):- या पध्दतीच्या उपप्रकल्पात शेतक-यांच्या नोंदणीकृत समुदाय आधारीत संस्था (CBO) आणि खरेदीदार संस्था निश्चित असतील व हे दोघे सामंजस्य कराराच्या माध्यमातून एकत्र येवून असा उपप्रकल्प तयार करतील.

ii) **बाजार संपर्क वाढ उपप्रकल्प** (Market Access Plan-MAP):- या पध्दतीच्या उपप्रकल्पात शेतक-यांच्या नोंदणीकृत समुदाय आधारीत संस्थांचा (CBO) खरेदीदाराबरोबर सामंजस्य करार नसेल परंतु शेतमाल नवीन बाजापेठ शोधून, ती निश्चित करुन तिथे शेतमाल विकला जाईल. निश्चित केलेल्या बाजारात (उद: परदेशी निर्यात, परराज्यातील अपारंपारीक बाजार) शेतमाल विकण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा पुरविण्यासाठी असा उपप्रकल्प असेल.

iii) **गोदाम आधारीत उपप्रकल्प** (Warehouse based Subprojects-WBS):- विकेंद्रीत स्वरुपातं गावपातळीवर शेतकऱ्यांसाठी शेतमाल साठवणूकीसाठी गोदाम आणि धान्य तारण सुविधा पुरविण्यासाठी हे उपप्रकल्प असतील. मुख्यत: विविध कार्यकारी प्राथमिक कृषि पतसंस्था (Primary Agriculture Cooperative Society - PACS) मार्फत हे प्रकल्प राबविले जातील.

iv) **नाविन्यपूर्ण पुरक उपप्रकल्प** (Complementary Innovative Investment Subproject-CII):- उपरोक्त तीन प्रकारच्या उपप्रकल्पामध्ये एखादी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची बाब राबवावयाची असल्यास त्यासाठी स्वतंत्र उपप्रकल्प राबविता येईल. उद: लागवड साहित्याची आयात, नाविन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान इ.

v) **स्मार्ट कॉटन उपप्रकल्प**:- कापूस पिकाच्या मुल्य साखळी विकासाठी एक स्वतंत्र उपप्रकल्प राबविण्यात येणार आहे. यातून शेतकरी गटांच्या माध्यमातून स्वच्छ व एकजिनसी कापूस उत्पादित करणे आणि रुई अधारीत बाजारात शेतक-यांचा सहभाग वाढविणे अपेक्षित आहे.

क) **जोखीम निवारणाची व्यवस्था उभी करणे :-** शेतक-यांना आपला शेतमाल काढणी नंतर लगेच विक्री करावा की तो साठवून त्यावर धान्य तारण योजनेतून कर्ज घेऊन नंतर काही दिवसांनी शेतमाल विकावा म्हणजेच बाजाराची जोखीम घ्यावी किंवा नाही याबाबत सल्ला देणारी यंत्रणा सध्या उपलब्ध नाही. स्मार्ट प्रकल्पात अशी यंत्रणा (Risk mitigation cell) कृषि आयुक्तालय स्तरावर उभी करणे प्रस्तावित आहे. ही यंत्रणा आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर विशिष्ट पिकांचे होणारे उत्पादन त्यांची मागणी व बाजार भावाचे कल इत्यादीचा अभ्यास करुन

शेतक-यांसाठी सल्ला देण्याचे काम करेल. त्याशिवाय शेतकऱ्यांना आणि शासनाला बाजारपेठेची माहिती, आगामी बाजारभावाचे अंदाज उपलब्ध करून देण्यासाठी कृषि आयुक्त स्तरावर बाजार माहिती व अन्वेषण यंत्रणा (Market Intelligence Cell) उभारण्यात येईल.

### ३) मुल्यसाखळी विकास (Value Chain Development):-

मुल्यसाखळी म्हणजे काय?

"मुल्यसाखळी म्हणजे शेतमालाच्या उत्पादनापासून उपभोगापर्यंत सर्व कार्यांची व ती कार्ये करणाऱ्या सर्व घटकांची साखळी होय. या साखळीमुळे उत्पादित शेतमालाची मालकी एका घटकापासून दुसऱ्या घटकाकडे जाते आणि या प्रक्रियेत शेतमालाच्या किंमतीत वाढ (मुल्यवृध्दी) होत जाते." या साखळीत शेतमालाच्या उत्पादनपूर्व कृषि निविष्ठा पुरवठा करणाऱ्यापासून शेतमालाचा उपभोग घेणाऱ्या ग्राहकापर्यंत सर्व घटकांचा व त्यांच्या कार्यांचा समावेश होतो.

शेतमालाच्या मुल्यसाखळीत पुढील मुख्य घटकांचा समावेश होतो- बियाणे, खते, अन्य निविष्ठांचे उत्पादक व विक्रते, शेतमाल उत्पादक शेतकरी, वाहतूकदार, आडते, खरेदीदार व्यापारी, प्रक्रिया उद्योग, निर्यातदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि ग्राहक. त्याशिवाय काही पुरक घटकांमध्ये बँका, विमा कंपन्या इ. घटकांचा समावेश होतो. हे घटक मुल्यसाखळीतील कोणत्याना कोणत्या तरी कार्यासाठी जबाबदार असतात.

### मुल्यसाखळी विकास :-

शेतमालाच्या मुल्यसाखळीतील सर्व घटकांना काही ना काही अडचणींना तोंड द्यावे लागते आणि या अडचणी सोडविण्यासाठी एकमेकांकडून काही अपेक्षा असतात. मुल्यसाखळी विकासासाठी या साखळीतील सर्व घटकांनी एकमेकांच्या अडचणी समजून घेवून सगळयांनी एकमेकांना पुरक अशी व्यवस्था निर्माण करणे अपेक्षित आहे. या सर्व घटकांना एका मंचावर आणून एकमेकांच्या अडचणी समजून घेऊन एकमेकांना पुरक व्यवस्था निर्माण करणे म्हणजेच मुल्यसाखळी विकसीत करणे होय. तथापि शेतमाल मुल्यसाखळीतील सर्व घटकांना एकत्र आणणारी अशी यंत्रणा, अथवा मुल्यसाखळी विकासासाठी स्वतंत्र असा कार्यक्रम, अशी योजना/प्रकल्प उपलब्ध नव्हता म्हणून स्मार्ट प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आहे. यापूर्वी कृषि विस्ताराचा मुख्य उद्देश "उत्पादकता वाढ" (प्रशिक्षिण व भेट योजना) हा होता तो नंतर शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्न वाढीसाठी "शेती पध्दतीवर" आधारीत (कृषि व पुरक व्यवसाय) कृषि विस्तार (आत्मा) असा झाला, त्यानंतर पुढे जाऊन तो "बाजाराभिमुख कृषि विस्तार" (MACP) असा झाला आणि आता त्यापुढे जाऊन "मुल्यसाखळी आधारीत कृषि विस्तार" असा उद्देश स्मार्ट प्रकल्पात ठेवण्यात आला आहे. मुल्यसाखळी विकासासाठी विस्तार कार्यक्रम स्मार्ट अंतर्गत

"मुल्यसाखळी विकास शाळा" (Value Chain Development School - VCDS) या घटकाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

४) मुल्यसाखळी विकास शाळा (Value Chain Development School - VCDS):-

स्मार्ट प्रकल्पांतर्गत मुल्यसाखळी विकासासाठीचा विस्तार कार्यक्रम "मुल्यसाखळी विकास शाळा" या संकल्पनेद्वारे राबविण्यात येत आहे.

**मुल्यसाखळी विकास शाळेची उद्दीष्टे :-**

i. मुल्यसाखळीतील सर्व घटकांमध्ये समन्वय व विश्वासाहार्यता वाढविणे.
ii. मुल्यसाखळीतील प्रत्येक घटकाची कार्यक्षमता वाढविणे.
iii. सर्वांसाठी एकमेकांना पुरक व फायदयाची व्यवस्था निर्माण करणे.
iv. ग्राहकाने मोजलेल्या रुपयातील/किंमतीतील शेतकऱ्यांचा हिस्सा किंवा वाटा वाढविणे.

वरील परिच्छेद (ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प समुदाय आधारीत संस्था (Community Based Organization-CBO) मार्फत राबविले जाणार आहेत. या संस्थांमधील शेतकऱ्यांसाठी "मुल्यसाखळी विकास शाळा" या विस्तार कार्यक्रमाचे आयोजन करणे अपेक्षित आहे. मुल्यसाखळी विकास शाळा हा एक प्रकारे एकात्मिक कृषि विस्ताराचा कार्यक्रम आहे. पारंपारिकरित्या कृषि विस्ताराचे साधन म्हणून शेतकरी प्रशिक्षण, शेतकरी सहल, कार्यशाळा, पीक प्रात्यक्षिके, शेतीशाळा इ. घटक स्वतंत्रपणे राबविण्यात येतात. स्मार्ट प्रकल्पात या साधनांचा वापर एकात्मिकरित्या एका विशिष्ट समुदाय आधारित संस्थेतील शेतकऱ्यांसाठी एका विशिष्ट पिकाच्या मुल्यसाखळी विकासाचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवून करण्यात येणार आहे आणि अशा एकात्मिक कृषि विस्ताराच्या कार्यक्रमाला "मुल्यसाखळी विकास शाळा" असे संबोधित करण्यात येत आहे. स्मार्ट प्रकल्पात पहिल्यांदा ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

**मुल्यसाखळी विकास शाळेचे लाभार्थी कोण असतील?**

मुल्यसाखळी विकास शाळेचे लाभार्थी हे वर नमुद केलेल्या स्मार्ट अंतर्गत PP, MAP, WBS या प्रकारच्या मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविणेसाठी प्राथमिक मान्यता मिळालेल्या CBO पैकी ज्या CBO नी सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) सादर केला आहे अशा CBO चे भागधारक शेतकरी असतील व त्यांची निवड CBO च्या संचालक बैठकीत करुन त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी. एखादया अशा CBO चा उपप्रकल्प जर एक वर्षाहून अधिक काळापर्यंत प्रकल्पामार्फत मंजुर झाला नाही तर अशा CBO ला मुल्यसाखळी विकास शाळेचे लाभ देणे थांबवावे. **मुल्यसाखळी विकास शाळेच्या एकुण लाभार्थ्यांपैकी किमान ५०% लाभार्थी महिला असाव्यात. महिला शेतका-यांच्या नावे शेती नसल्यास CBO च्या भागधारक शेतकरी कुटुंबातील (पती, पत्नी व १८ वर्षांखालील मुले) कोणाच्याही नावे शेती असल्यास अशा कुटुंबातील महिलांना**

लाभ दयावा. अशा बाबतीत शासनाच्या लक्ष्मी मुक्ती धोरणानुसार महिलांना सहखातेदार करण्यास उद्युक्त करावे. याशिवाय अनुसुचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना किमान जिल्हयातील या प्रवर्गाच्या शेतकरी संख्येच्या प्रमाणात लाभ दयावा.

**५) मुल्यसाखळी विकास शाळेचे उपघटक :-**

i. उत्पादन तंत्रज्ञान व बाजार संमेलन – Tech Market Meet

ii. बाजाराभिमुख पिक प्रात्यक्षिके – Market Led Crop Demonstration

iii. शेतकरी शेतीशाळा – Farmer Field School

iv. प्रशिक्षणासह अभ्यास दौरे – Training Cum Exposure Visits

अ) राज्यांतर्गत प्रशिक्षणासह अभ्यास दौरे – Within State Training Cum Exposure Visits

ब) राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरे – Out of state Training Cum Exposure Visits

क) परदेशातील प्रशिक्षणासह अभ्यास दौरे – International Training and Exposure Visits

v. विविध बाजारपेठांच्या आवश्यकतेनुसार लागणारे गॅप प्रमाणपत्र, सेंद्रीय प्रमाणीकरण इ. उपक्रम. GAP Certification, Food Security Traceability, Organic Certification etc.

vi. उपप्रकल्प अंमबजावणीतील तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी आंतराष्ट्रीय अभ्यास दौरे – International Exposure Visits for Technical Staff.

**i. उत्पादन तंत्रज्ञान व बाजार संमेलन (Tech Market Meet) :-**

हा उपघटक विभागीय कृषि सहसंचालक स्तरावरील स्मार्ट प्रकल्पाच्या विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत विभागातील सर्व जिल्हयासाठी एकत्रितपणे राबविण्यात यावा. यासाठी देण्यात येणाऱ्या वार्षिक लक्षांकानुसार कार्यक्रम राबवावा. MACP प्रकल्पात खरेदीदार-विक्रेता संमेलन ही बाब राबविण्यात येत होती. तथापि, या संमेलनात मुल्यसाखळीतील उत्पादक शेतकरी आणि खरेदीदार या दोनच घटकांचा समावेश होता. आता उत्पादन तंत्रज्ञान व बाजार संमेलनसाठी (Tech Market Meet) मुल्यसाखळीतील सर्व घटकांना (निविष्ठा उत्पादक, शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांपासून ग्राहकापर्यंत) आमंत्रित करुन एकामंचावर आणने आपेक्षित आहे. स्मार्ट प्रकल्पातंर्गत मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविण्यासाठी निवडलेल्या समुदाय आधारित संस्थांचे प्रातिनिधीक शेतकरी (सुमारे ५०), विविध निविष्ठा व तंत्रज्ञान पूरविणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी, कृषि विद्यपीठ, संशोधन संस्था, आडते, व्यापारी, निर्यातदार, प्रक्रीयादार, घाऊक विक्रते, किरकोळ विक्रेते, वाहतुक व्यवस्थेशी निगडीत सदस्य, बँकेचे प्रतिनिधी (सर्व मिळून सुमारे ३०), स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधीत अधिकारी, कर्मचारी, सेवा पुरवठादार संस्था प्रतिनिधी (सुमारे २०), अशा सुमारे १०० प्रतिनिधीचे हे एकदिवसीय संमेलन असेल. यासाठी प्रति संमेलन अधिकतम रु.१.०० लाख प्रमाणे तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल. या उपक्रमामध्ये

मुल्यसाखळीतील सर्व घटकांच्या प्रतीनिधींना एका व्यासपीठावर आमंत्रीत करणे अपेक्षीत आहे.

अशी संमेलने पिकनिहाय घेणे चांगले तथापी जर एखाद्या पिकाचे विभागात अधिक उपप्रकल्प असतील तर एका पिकासाठी स्वतंत्र संमेलन घ्यावे. जर अशी परिस्थिती नसल्यास फलोत्पादन पिकासाठी आणि अन्य शेतपिकांसाठी स्वतंत्र संमेलने घ्यावीत. खरीप व रब्बी हंगामाच्यापूर्वी अशी संमेलने घ्यावीत. या संमेलनात पिकाच्या मुल्यसाखळीतील प्रत्येक घटकाच्या प्रतिनिधींना अन्य घटकापासून काय अपेक्षा आहेत अथवा मुल्यसाखळीत त्या घटकाच्या काय अडचणी आहेत याबद्दल मत व्यक्त करण्यास संधी द्यावी. एकमेकांच्या अडचणी समजून घेतल्यानंतर विशिष्ट पिकाची अस्तित्वात असलेली मुल्यसाखळी समजून त्याची मांडणी पोस्टरवर लिखीत स्वरुपात आकृती काढून मांडावी. तद्नंतर या अस्तितवात असलेली मुल्यसाखळी एकमेकांना पूरक व कार्यक्षम कशी करता येईल याबद्दल चर्चा व विचारमंथन करुन सुधारीत मुल्यसाखळी कशी असावी याची मांडणी करावी व आकृतीच्या स्वरुपात ती पोस्टरवर दाखवावी. सर्वांना पुरक अशा प्रस्तावित मुल्यसाखळीची मांडणी करणे आणि तिची अंमलबजावणी करण्यासाठी रुपरेषेनुसार मुल्यसाखळीचा उपप्रकल्प असणे अपेक्षित आहे. तसेच मुल्यसाखळी विकास शाळेतील कृषि विस्ताराच्या सर्व उपघटकांची अंमलबजावणी सुधारीत मुल्यसाखळी लक्षात घेऊन करणे अपेक्षित आहे.

ii. **बाजाराभिमुख पिक प्रात्यक्षिके (Market Led Demonstration) :-**

पिक प्रात्यक्षिके ही मुलत: पिकाच्या सुधारीत उत्पादन तंत्राज्ञानाचा वापर करुन उत्पादकता वाढविण्यासाठी घेतली जातात. तथापि, शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नात वाढ करावयाची झाल्यास उत्पादकता वाढीबरोबरच उत्पादीत शेतमालाला बाजारात मागणी हवी, उत्पादित मालाचा दर्जा चांगला हवा तरच चांगला भाव मिळणे शक्य आहे. हे उद्दिष्ट साध्य करावयाचे झाल्यास "विकेल ते पिकेल" या अभियानाच्या तत्वानुसार बाजाराभिमुख पिक प्रात्यक्षिके स्मार्ट प्रकल्पातून घेणे अपेक्षित आहे. मुल्यसाखळी विकास शाळा राबविण्यासाठी पात्र असलेल्या CBO च्या सदस्य (भागधारक) शेतकऱ्यांमधून प्रतीवर्षी ३० नवीन_शेतकऱ्यांना या बाबीचा लाभ द्यावा. ही बाब प्रतीवर्षी ३० प्रात्यक्षिके याप्रमाणे ४ वर्षे राबवावयाची आहे. एका शेतक-याला एकदाच लाभ द्यावा. म्हणजेच एका CBO च्या एकुण १२० शेतकऱ्यांना लाभ द्यावा. प्रात्यक्षिकांचे लाभार्थी हेच शेतीशाळाचे लाभार्थी (विद्यार्थी शेतकरी) असतील. प्रत्येक वर्षी शेतकरी निवडताना शक्यतो वर सलग क्षेत्रातील / एका शिवारातील निवडावेत.

स्मार्ट प्रकल्पात पिक प्रात्यक्षिकांचे मापदंड खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | पिकाचा प्रकार | प्रात्यक्षिकाचे क्षेत्र | मापदंड (अनुदान) रु. |
|---|---|---|---|
| १ | फलोत्पादन पिके | १ एकर | ६००० |
| २ | इतर शेतपिके | १ एकर | ५००० |

पिक प्रात्यक्षिकात तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी संवेदनशील निविष्ठा (Critical Input) आणि संवेदनशील लागवडीचे तंत्र (Critical Practice) या दोन्ही बाबींना महत्व आहे. पिक प्रात्यक्षिक म्हणजे केवळ निविष्ठा वाटप नव्हे तर संपूर्ण सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करुन त्या भागातील अन्य शेतकऱ्यांपेक्षा अधिक उत्पादकता आणणे, बाजाराच्या /खरेदीदाराच्या मागणीप्रमाणे उत्पादन घेणे आणि शेतमालाचा दर्जाही उत्तम ठेवणे अपेक्षित आहे. यासाठी ३० प्रात्यक्षिक प्लॉटच्या मागे एक त्या भागातील पारंपारिक पध्दतीने पिक घेणाऱ्या शेतकऱ्याचा Control प्लॉट निवडावा आणि त्याची तुलनात्मक निरिक्षणे (उत्पादकता) प्रकल्पाच्या MIS साठी नोंदवावीत.

**Critical Input:-** पिक प्रात्यक्षिकांचे अनुदानावर शेतकऱ्यांना द्यावयाच्या निविष्ठांचे किट तयार करताना शेतकरी वापरत नसलेल्या परंतू उत्पादकता वाढीसाठी अत्यावश्यक असलेल्या Critical Input वर भर देण्यात यावा. अनुदानावर देण्यात येणाऱ्या निविष्ठांच्या गुणवत्ता तपासणीसाठीचे मापदंड/गुणवत्तेची मानांकने निश्चित असावेत आणि ते तपासून प्रमाणित करता आले पाहीजेत. वितरित करण्यात येणाऱ्या निविष्ठा गुणवत्तापूर्ण असाव्यात. किटमध्ये प्रामुख्याने बियाणे (उपप्रकल्पातील खरेदीदाराच्या/नवीन बाजाराच्या आवश्यकतेनुसार सार्वजनिक अथवा खाजगी कंपन्यांचे), शिफारसीनुसार रासायनिक खते (केवळ सरळ व संयुक्त रासायनिक खते), बिजप्रक्रीयेसाठी जैविक खते, तणनाशके, रासायनिक किटक व बुरशीनाशके यांचा समावेश करावा. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची मिश्र खते, सेंद्रीय खते, बिजप्रक्रीये व्यतीरिक्त जैविक खते, पिक संजिवके, सुक्ष्म मुल्यद्रव्ये, जैविक किटक व बुरशी नाशके व अन्य जैविक पिक संवरक्षक औषधी, विविध किड नियंत्रक सापळे इ. निविष्ठा शक्यतो प्रकल्पात अनुदानातून देऊ नयेत. अशा निविष्ठांची फारच आवश्यकता असल्यास ती शेतकऱ्यांनी स्व: खर्चाने खरेदी करण्यास हरकत नाही.

<u>Critical Practice:-</u> Critical Practice साठी प्रती एक एकर क्षेत्राच्या प्रात्यक्षिकासाठी रु.१०००/- शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रोत्साहानात्मक अनुदान वर्ग करावे. पिकनिहाय Critical Practice जिल्हयाच्या SREP मध्ये नमुद आहेत. त्याचा मार्गदर्शक तत्व म्हणुन वापर करावा. SREP मध्ये नमूद नसल्यास कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र शिफारसीत Critical Practice साठी असे अनुदान द्यावे. याबाबत पिकनिहाय मार्गदर्शक/सुचक (अंतीम नव्हे)

Critical Practices खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | पिक | Critical Practices |
|---|---|---|
| १ | सर्व पिके | शिफारसीनुसार दोन ओळीतील आणि दोन रोपातील अंतर |
| २ | सोयाबीन | BBF पध्दतीने पेरणी, सरी वरंब्यावर पेरणी, ठिबक/तुषार सिंचनाचा वापर |
| ३ | कापूस | ठिबकचा वापर, फरदड न घेणे |
| ४ | तूर | शिफारसी नुसार दोन ओळीतील व दोन रोपातील अंतर यासाठी रोपांची विरळणी |
| ५ | भात | चारसुत्री, SRI |
| ६ | हरभरा | सरी वरंब्यावर टोकण पध्दतीने लागवड, ठिबक |
| ७ | मका | टोकण पध्दतीने लागवड, ठिबकचा वापर |

उपरोक्त पध्दतीने शिफारसीनुसार लागवड करण्याबाबत कृषि सहाय्यक/ बीटीएम यांच्या मार्फत प्रशिक्षणाच्या/शेती शाळेच्या माध्यमातून शेतक-यांना माहिती द्यावी आणि **कोणत्या Critical Practices चा वापर केल्यास हे प्रोत्साहनपर अनुदान मिळेल याबाबत सीबीओला लेखी कळवावे.** शिफारसीनुसार Critical Practices चा अवलंब केल्याबाबत क्षेत्रीय कृषि सहाय्यक/बीटीएम यांचे प्रमाणपत्र घेऊन त्या आधारे शेतकऱ्यांना रु. १०००/- प्रती एकर क्षेत्राच्या प्रात्यक्षिकासाठी शेतक-याच्या बँक खात्यावर वर्ग करावेत. याबाबतचे पर्यवेक्षण कृषि विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी (कृषि पर्यवेक्षक ते विभागीय कृषि सहसंचालक) नेमून दिलेल्या प्रमाणात करावे, जेणेकरून शेवटच्या घटकावर नियंत्रण राहील आणि प्रसंगी त्यांच्यावर लाभार्थ्यांकडून दबाव येणार नाही. जर लाभार्थी शेतकऱ्यांनी अशा Critical practices चा अवलंब केला नाही तर त्यांना हे प्रोत्साहानपर अनुदान देऊ नये.

बाजाराभिमुख पिक प्रात्यक्षिके आयोजनासाठी निविष्ठांची खरेदी/संपादन जागतिक बँकेच्या नियमानुसार शॉपिंग पध्दतीने प्रकल्पामार्फत निर्गमित परिपत्रकानुसार (दरपत्रके मागवून) प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर करावीत. कृषि उद्योग विकास महामंडळ, महाबीज इ. शासकीय संस्थांकडून निविष्ठा खरेदी करता येतील तथापि, त्यांचे दर हे शॉपींग पध्दतीतील अनेक दरपत्रकापैकी एक दरपत्रक म्हणून वापरावे लागतील.

### iii) **शेतकरी शेतीशाळा** (Farmer Field School) :-

शेतीशाळेचे विद्यार्थी शेतकरी हे प्रात्यक्षिकांचे लाभार्थी असतील. प्रात्यक्षिकांप्रमाणेच मंजूर उपप्रकल्पातील लाभार्थ्यांसाठी सलग ४ वर्षे शेतीशाळा आयोजित करावयाच्या आहेत. उत्पादकता वाढीबरोबरच बाजाराभिमुख तंत्रज्ञानाच्या प्रसारावर शेतीशाळेत भर द्यावा. जर

प्रात्यक्षिकांसाठी खाजगी कंपन्यांचे तंत्रज्ञान वापरले असेल तर त्या कंपनीच्या प्रतीनीधींना शेतीशाळेत सहभागी करुन घ्यावे. शेतीशाळेचा मापदंड हा रु.३२,०००/- प्रती शेतीशाळा राहील. वार्षिक फलोत्पादन पिकांच्या शेतीशाळेच्या वर्गांचे आयोजन बहार धरल्यापासून पिक काढणीपर्यंत दर महिन्यातून एकदा आणि तद्नंतर दर दोन महिन्यांनी एकदा करावे. अन्य शेतपिक व भाजीपाला पिकांच्या शेतीशाळेचे वर्ग पिकांच्या पेरणीपूर्व ते काढणी पश्चात तंत्रज्ञानाबाबत पिक वाढीच्या अवस्थेनुसार दर आठवडयाला/पंधरा दिवसातून एकदा आयोजित करावे. पिकनिहाय घ्यावयाच्या शेतीशाळा वर्गांची किमान संख्या खालीलप्रमाणे असावी.

| अ.क्र | पिके | वर्ग संख्या |
|---|---|---|
| १ | भात, कापूस, तूर, हळद | ६ |
| २ | सोयाबीन, मका, रब्बी ज्वारी, हरभरा, गहू, मूग, उडीद, भाजीपाला पिके | ५ |
| ३ | वार्षिक फळपिके | ९ |

शेतीशाळेचे आयोजन एटीएम/बीटीएम/कृषि सहाय्यक यांचेमार्फत करण्यात यावे. शेतीशाळा आयोजनाची जबाबदारी असलेल्या कर्मचाऱ्याला ToF प्रशिक्षीत अधिकारी/ कर्मचाऱ्यामार्फत प्रशिक्षण द्यावे.

संचालक विस्तार व प्रशिक्षण यांचेमार्फत निर्गमीत मार्गदर्शक सुचनानुसार पिक निहाय शेतीशाळांच्या प्रत्येक वर्गात कोणता विषय घ्यावा हे ठरवावे.

- **शेतीशाळेसाठी प्रशिक्षण संच:-**

  शेतीशाळा वर्गामध्ये प्रशिक्षक आणि शेतकरी यांना निरिक्षणे घेण्यासाठी आणि सदर शिक्षण पध्दती परिणामकारक होण्यासाठी काही प्रशिक्षण साहित्याची आवश्यकता असते उदा: रजिस्टर, फुटपट्टी, Sketch Pen, कोरे व Drawing कागद, १० x चे भिंग, लहान व्हायल्स इ. सदरच्या प्रशिक्षण साहित्यांची खरेदी स्वत: एटीएम/बीटीएम/कृषि सहाय्यक यांनी त्यांना खालील तक्यात दिलेल्या बाब निहाय तरतूदीमधून करावी. कोणत्याही परिस्थितीत तालुका स्तरावरुन साहित्यांची एकत्रित खरेदी करु नये.

- शेतीशाळेसाठी आर्थिक मापदंड:-

| अ. क्र. | बाब | खर्च मर्यादा (रक्कम रु.) | अग्रीम समायोजनासाठी द्यावयाची कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | विस्तार प्रकल्प अहवाल तयार करणे, एटीएम/बीटीएम/कृषि सहाय्यकांना देय रक्कम | ५०० | शेतीशाळा आयोजनकर्त्या कर्मचाऱ्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व प्रकल्प अहवाल | विहीत प्रपत्रात प्रकल्प अहवाल तयार करावा. |
| २) | **व्याख्यात्याचे मानधन:-** प्रती व्याख्याता प्रती वर्ग रु.५००/- व्याख्यातासह घ्यावयाच्या वर्गांची अधिकतम संख्या ६. व्याख्याते कोण असावेत हे मंडळ कृषि अधिकारी अथवा त्याहून वरीष्ठ अधिकाऱ्यांनी ठरवावे. (कृषि विभागातंर्गत कर्मचारी /अधिकारी हे व्याख्याते असल्यास ही रक्कम देय राहणार नाही.) | ३००० | व्याख्यात्याला रोख रक्कम दिल्याबाबत पावती | व्याख्याते कृषि विद्यापीठ, KVK, संशोधन केंद्र, खाजगी / निवृत्त विषय तज्ञ, रिसोर्स फार्मर |
| ३) | व्याख्यात्याचे ने-आण करण्यासाठीचा तसेच त्यांचे भोजन इ. अनुषंगीक खर्चासाठी शेतीशाळेचे आयोजन करणाऱ्या कृषि सहाय्यक/एटीएम/ बीटीएम यांना द्यावयाची रक्कम प्रती व्याख्याता प्रती वर्ग रु.१०००/- अधिकतम वर्ग संख्या ६ (कृषि विभागातंर्गत कर्मचारी/अधिकारी हे व्याख्याते असल्यास ही रक्कम देय राहणार नाही.) | ६००० | शेतीशाळा आयोजनकर्त्या कर्मचाऱ्याचे उपयोगिता प्रमाणपत्र | यासाठी आवश्यकते नुसार भाडोत्री वाहन तसेच तिकीट खर्च, व्याख्यात्याचे जेवण इ. बाबींवर खर्च करणे अपेक्षीत आहे. |
| ४) | ज्या पिकाची शेतीशाळा घेण्यात येणार आहे त्या पिकाची माहिती पुस्तिका तयार करुन/खरेदी करुन देणे यासाठी अधिकतम खर्च (प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर) | ५००० | पावती तथापि अग्रीम नाही | हा खर्च प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर होणार असलेने अग्रीम प्रतीपुर्ती अपेक्षीत नाही. |
| ५) | **शेती शाळेतील विद्यार्थी शेतकऱ्यांसाठी लेखन साहित्य, चहा-पान, नाश्ता यासाठी कृषि सहाय्यक / एटीएम/बीटीएमला द्यावयाचे अनुदान:-** प्रती वर्ग रु.१०००/- अधिकतम रु. ६०००/- | ६००० | शेतीशाळा आयोजनकर्त्या कर्मचाऱ्याचे उपयोगिता प्रमाणपत्र | |
| ६) | शेती दिन | ८००० | पावत्या | |
| ७) | ज्या शेतकऱ्याचे शेतावर शेतीशाळा घ्यावयाची आहे त्या शेतकऱ्यास प्रोत्साहनपर अनुदान | ३००० | रोख रक्कम मिळालेबाबतची पावती | |
| ८) | यशोगाथा तयार करणेसाठी | ५०० | शेतीशाळा आयोजनकर्त्या कर्मचाऱ्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व यशोगाथा | |
| | **एकूण** | **३२०००** | | |

वरीलप्रमाणे शेतीशाळेचे आयोजन करावयाच्या कर्मचाऱ्याच्या स्तरावर (एटीएम/ बीटीएम/ कृषि सहाय्यक) रु.२७०००/- खर्च करावयाचे आहेत आणि प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर रु.५०००/- खर्च करावयाचे आहेत. शेतीशाळेचे आयोजन करावयाच्या कर्मचाऱ्याला दोन टप्यात PFMS व्दारे अग्रीम द्यावा. पहिल्या टप्यात हंगामाच्या सुरुवातीला रु.२०,०००/- आणि या अग्रीमाचे समायोजन झाल्यानंतर दुसऱ्या टप्यात उर्वरीत रु.७०००/- द्यावेत.

- **शेतीदिन:**- शेतीशाळेमध्ये अवलंब केलेल्या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रचार-प्रसार करण्यासाठी पिक वाढीच्या शेवटच्या टप्प्यात एक दिवसीय शेतीदिनाचे आयोजन करावे. यासाठी कृषि विद्यापीठ /कृषि विज्ञान केंद्र/कृषि संशोधन केंद्र/कृषि महाविद्यालय येथील तज्ञांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करावे. शेतीदिनामध्ये किमान ५०% महिलांचा सहभाग होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. शेतीदिनामध्ये शेतीशाळेतील प्रशिक्षणार्थींना त्याचे अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करावे. तसेच कोणते तत्रज्ञांन उपयुक्त ठरले याबाबत चर्चा घडून आणावी.

**iv) प्रशिक्षणासह अभ्यास दौरे** - Training Cum Exposure Visits :-

याबाबीचा लाभ ही एका सीबीओला सलग ४ वर्षे द्यावयाचा आहे. शेतकऱ्यांसाठी केवळ प्रशिक्षण वर्ग आयोजित केल्यास त्यांची परिणामकारता अपेक्षेप्रमाणे कधी कधी मिळत नाही तसेच केवळ अभ्यास दौरे सुध्दा कधी कधी परीणामकारक होत नाहीत, ही बाब लक्षात घेवून एकत्रितपणे "प्रशिक्षणासह अभ्यास दौरे" या नावाने राबविणे अपेक्षित आहे. यात ज्या पिकाची मुल्यसाखळी विकसीत करावयाची आहे त्या पिकाच्या संशोधन संस्थेची (कृषि विद्यापीठे व त्यांची संशोधन केंद्रे, राष्ट्रीय संशोधन केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे ) निवड करुन तेथे प्रशिक्षण वर्ग घ्यावेत. निवडलेल्या प्रशिक्षण केंद्राला प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी संस्थांत्मक खर्च आल्यास तो संस्थेला देता येईल. निवड केलेल्या संस्थेला संस्थात्मक खर्चातून प्रक्षेत्रावर विशिष्ट पिकाचे Crop Cafeteria तयार करणे, प्रशिक्षण साहित्य तयार करणे इ. बाबीसाठी निधी देता येईल.

निवडलेल्या संस्थेच्या प्रक्षेत्राला भेट देणे, तसेच प्रवासातील स्थळामध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतावर तंत्रज्ञानाचा अंवलब प्रभावीपणे केलेला आहे अशा यशस्वी शेतकऱ्यांच्या शेतांना, त्या पिकाच्या मुल्यसाखळीतील बाजार स्थळे, प्रक्रीया केंद्रे, संबंधित अन्य उद्योग इ. ठिकाणी भेटी आयोजित करुन त्या मुल्यसाखळीतील अडचणी, बारकावे आणि तंत्रज्ञान समजून घेणे अपेक्षित आहे. प्रशिक्षण/संशोधन संस्थेची आणि दौरा क्षेत्राची निवड सीबीओला मंजूर झालेल्या प्रकल्पाशी सुसंगत असावी आणि ही निवड प्रकल्प अंमलबजावणी करणाऱ्या प्रकल्प संचालक, आत्मा /प्रकल्प उपसंचालक, आत्मा/अन्य वरीष्ठ अधिकाऱ्यांनी करावी. या घटकासाठी प्रति बॅच किती शेतकरी असावेत याबाबतचा निर्णय उपलब्ध भौतिक अर्थिक लक्षांकाच्या आधारे घ्यावा. एका जिल्हयातून उपप्रकल्प कमी असल्याने एखाद्या पिकाचा प्रशिक्षणासह अभ्यास

दौऱ्यासाठी शेतकऱ्यांची बॅच पुर्ण होवू शकत नसल्यास एकतर जिल्हयातील प्रती सीबीओ प्रती वर्ष शेतकरी संख्या वाढवावी (अधिकतम संख्येच्या मर्यादेत राहून) अथवा शेजारच्या जिल्हयाबरोबर समन्वय साधून एकत्रीत या बाबीचे आयोजन करावे. शेतकऱ्यांची संख्या २५ पर्यंत असल्यास एक अधिकारी किंवा कर्मचारी सोबत जाईल आणि शेतकऱ्यांच्या संख्या २५ पेक्षा जास्त असल्यास अधिकतम दोन अधिकारी/कर्मचारी सोबत जातील. सोबत जाणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचा खर्चही शेतकऱ्यांच्या दराने याच बाबीतून करावा.

मापदंडाच्या अधीन राहून याबाबीसाठी प्रवासात लागणाऱ्या खर्चासाठी आवश्यक अग्रीम अभ्यास दौऱ्या सोबत जाणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्याला अग्रीमाच्या स्वरुपात देता येईल.

| अ. क्र. | प्रशिक्षणासह अभ्यास दौऱ्याचा प्रकार | प्रशिक्षण दौरा कालावधी दिवस | प्रति शेतकरी प्रति दिन खर्चाचा मापदंड रु. | प्रतिवर्षी प्रती सीबीओ निवडावयाचे शेतकरी संख्या |
|---|---|---|---|---|
| अ) | राज्यांतर्गत प्रशिक्षणासह अभ्यास दौरे - Within State Training Cum Exposure Visit | ३ | २००० | ५ |
| ब) | राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरे - Out of State Training Cum Exposure Visit | ७ | ३००० | ५ |

फलोत्पादन पिकासाठी परदेशातील अभ्यास दौरे - International Training Cum Exposure Visit

| अ. क्र. | प्रशिक्षणासह अभ्यास दौऱ्याचा प्रकार | प्रशिक्षण दौरा कालावधी दिवस | प्रति शेतकरी खर्चाचा मापदंड रु. | प्रती सीबीओ निवडावयाचे एकुण शेतकरी संख्या |
|---|---|---|---|---|
| क) | फलोत्पादन पिकासाठी परदेशातील अभ्यास दौरे - International Training Cum Exposure Visit | आवश्यकतेनुसार तथापि अनुदान मर्यादा लक्षात घेवून | १,६०,०००/- | २ |

उपरोक्त परदेश दौरा बाबत स्वतंत्र मार्गदर्शक सुचना काढण्यात येतील.

**v) विविध बाजारपेठांच्या आवश्यकतेनुसार लागणारे गॅप प्रमाणपत्र सेंद्रीय प्रमाणीकरण इ. उपक्रम -** GAP Certification, Food Security, Traceability, Organic Certification etc:- स्मार्ट अंतर्गत मंजूर उपप्रकल्पात गॅप इ. प्रमाणीकरणाची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा खर्च या घटकातून करण्यात येईल. स्मार्ट प्रकल्पातून गॅप, सेंद्रीय इ. प्रमाणीकृत सुमारे १२५०० शेतकऱ्यांचे लक्षांक ठेवण्यात आले आहे. यासाठी आवश्यकता भासल्यास उपप्रकल्पा

बाहेरीलही क्षेत्रांचे प्रमाणीकरण करण्यात येईल. याबाबतचे जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्षांक सोबत प्रपत्र ६ जोडले आहे. याबाबीसाठी प्रमाणिकरण यंत्रणेमार्फत आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या ६०% अनुदान प्रकल्पातून देता येईल. लक्षांकानुसार प्राथम्याने स्मार्ट प्रकल्पात निवडलेल्या सीबीओचे प्रस्ताव संचालक, आत्मा यांचेकडे सादर करावेत. स्मार्ट प्रकल्पात सीबीओचे प्रस्ताव नसल्यास अन्य सीबीओचे प्रस्ताव सादर करावेत. याबाबतच्या प्रकल्प अहवालाबाबत मार्गदर्शक सुचना, प्रपत्र नंतर परिपत्रीत करण्यात येतील, तथापि लक्षांकानुसार सीबीओंची /गटांच्या संख्या व क्षेत्र याची मागणी करावी.

**vi) उपप्रकल्प अंमलबजावणीतील तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे -**

International Exposure Visit for Technical Staff:- स्मार्ट प्रकल्पात क्षेत्रीय पातळीवर मुल्यसाखळी विकास शाळेचे उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर आंतरराष्ट्रीय दौरे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. या बाबी खाली सुमारे ५५० कर्मचाऱ्यांना लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. अशा दौऱ्यांसाठी प्रति कर्मचारी अधिकतम रु.२.०० लाख पर्यंत खर्च प्रकल्पातून अपेक्षित आहे. या घटकांखालील कर्मचाऱ्याची निवड राज्यस्तरीय समिती करेल.

उपरोक्त सर्व घटकांसाठी आवयश्क वस्तू व सेवांची खरेदी करणे, अधिकारी / कर्मचारी यांना अग्रीम देणे, त्याची प्रतीपुर्ती करणे याबाबत वेळोवेळी निर्गमित परीपत्रकानुसार, प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका (Finance Management Manual - FMM) आणि प्रापण पुस्तिकेनुसार (Procurement Manual-PM) नुसार करावी.

**सामाजिक व पर्यावरण:-**

सामाजिक सुरक्षिततेच्या अनुषंगाने VCDS च्या मध्यमातून शेतकऱ्यांमध्ये खालील गोष्टींची जागरुकता निर्माण करावी.

१. शेतीमध्ये बाल कामगार तसेच वेठ बिगार प्रतिबंध करण्याबद्दल जागरुकता निर्माण करावी.
२. समान कामाकरीता महिला/पुरुष कामगारांना समान मजुरी देणेबाबत जागरुकता निर्माण करावी.
३. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ बद्दल शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी.
४. औषधी फवारणी करताना कामगाराने सुरक्षा किटचा वापर करुनच फवारणी करणेविषयी जागरुकता निर्माण करावी.

शेती परीसरातील माती, पाणी, हवा तसेच संबंधित जैव विविधता या व इतर पर्यावरणीय घटकांवर विपरीत परीणाम होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

VCDS च्या प्रत्येक घटकाचे रिपोर्टिंग हे Gender disaggregated (महिला व पुरुष लाभार्थी), जमीन धारणेनुसार शेतकऱ्यांची वर्गवारी (अल्प, अत्यल्प व सर्वसाधारण शेतकरी) व सामाजिक वर्गवारीनुसार (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण शेतकरी) यानुसार करणे बंधनकारक आहे.

**संनियत्रण व मुल्यमापन:-** स्मार्ट प्रकल्पातंर्गत मुल्यसाखळी विकास शाळेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पर्यवेक्षकीय अधिकारी (कृषि पर्यवेक्षक ते विभागीय कृषि सहसंचालक) यांनी वेळोवेळी प्रकल्पाला भेट देवून तपासणी करुन मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. यासाठी पुढीलप्रमाणे पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यासाठी तपासणीचे प्रमाण निश्चित करण्यात आलेले आहे. पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीचे अहवाल त्यांच्या निकटतम वरीष्ठ अधिकाऱ्यांना सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र. ५ नुसार सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पाचे Online MIS तयार झाल्यावर त्यात तपासणी बाबत माहिती भरावी.

| अ. क्र. | पर्यवेक्षकीय अधिकारी | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | विभागीय स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्तरावरील अधिकारी (नोडल अधिकारी-RIU) | आपले अधिनस्त असणाऱ्या सर्व जिल्हयातील पीक लागवड हंगामात प्रत्येकी किमान ४ सीबीओंना महिन्यातून एकदा भेट देवून तपासणी करावी. |
| २ | विभागीय स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्तरावरील सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ | आपले अधिनस्त असणाऱ्या सर्व जिल्हयातील पीक लागवड हंगामात प्रत्येकी किमान ४ सीबीओंना महिन्यातून एकदा भेट देवून तपासणी करावी. |
| ३ | जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावरील प्रकल्प संचालक, आत्मा | पीक लागवड हंगामात महीन्यातून जिल्हयातील किमान ४ सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पदाचा पदभार असल्यास महीन्यातून किमान १ सीबीओंला भेट देऊन तपासणी करावी. |
| ४ | जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावरील नोडल अधिकारी-DIU | पीक लागवड हंगामात महीन्यातून जिल्हयातील किमान ४ सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |
| ५ | जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावरील पुरवठा साखळी व मुल्यसाखळी तज्ञ | पीक लागवड हंगामात महीन्यातून जिल्हयातील किमान ६ सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |
| ६ | उपविभागीय कृषि अधिकारी | पीक लागवड हंगामात महीन्यातून उपविभागातील किमान २ सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |
| ७ | तालुका कृषि अधिकारी | पीक लागवड हंगामात महीन्यातून तालुक्यातील किमान १ सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |
| ५ | मंडळ कृषि अधिकारी | पीक लागवड हंगामात महीन्यातून मंडळातील सर्व सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |
| ६ | कृषि पर्यवेक्षक | पीक लागवड हंगामात महीन्यातून सजातील सर्व सीबीओंना भेट देवून तपासणी करावी. |

**माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS):-** जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने (DIU) माहिती व्यवस्थापन प्रणालीवर जिल्हयातील मुल्यसाखळी विकास शाळेच्या घटकांची भौतिक व आर्थिक अंमलबजावणीची सर्व माहिती विहीत प्रपत्रात भरणे अनिवार्य आहे. या संदर्भातील लिंक जिल्हानिहाय ई-मेलव्दारे लवकरच कळविण्यात येईल. सदर लिंक संबंधित क्षेत्रीय कर्मचाऱ्यास शेअर करुन त्यांच्याकडून प्रपत्र १, ३, ४ ची माहिती दिनांक १५ जुन २०२२ पर्यंत भरावी. तरी आपले स्तरावर सर्व अहवाल अद्यावत ठेवण्यात यावे. तसेच पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीचे अहवाल (प्रपत्र-५) MIS मध्येच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सोबत :-** प्रपत्र क्र. १ ते ६

**संचालक, आत्मा**
**कृषि आयुक्तालय, पुणे तथा**
**विभाग प्रमुख,प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि),स्मार्ट**

---

जा.क्र. स्मार्ट संचा.आत्मा/स्मार्ट/मु.वि.शा./मा.सु./३२१/२०२२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
दिनांक २३/०५/ २०२२

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव -

१) सर्व नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, स्मार्ट
२) सर्व विभागीय कृषि सह संचालक
३) सर्व प्रकल्प संचालक, आत्मा

# प्रपत्र -१

## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

## मुल्यसाखळी विकास शाळा- विस्तार प्रकल्प आराखडा (वर्ष २०-- २०--)

१) सीबीओचे नाव - गाव - ता. जि.

२) पीक -

३) क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचा तपशिल -

| अ.क्र. | नाव | पदनाम | सजा | मोबा. नं. | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | | एटीएम / बीटीएम/कृषी सहाय्यक | | | |
| २ | | कृषि पर्यवेक्षक | | | |
| ३ | | मंडळ कृषि अधिकारी | | | |
| ४ | | सीबीओचे जबाबदार संचालक | - | | |
| ५ | | सीबीओचे सचिव/सीईओ/ व्यवस्थापक | | | |

४) पायाभूत माहिती

पीक :-

| अ.क्र. | बाब | मंडळ | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | सरासरी उत्पादकता (किलो/हे.) | | | |
| २ | क्षेत्र (हेक्टर) | | | |

उपप्रकल्पाचे पीक उत्पादकतेचे लक्षांक---------किलो/हे.

५) तंत्रज्ञान अवलंबनातील ऊणीवा (Gap- Full -F, Partial -P, No gap-N)

| अ.क्र. | बाब | शिफारस | उणीव (gap) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Full-F | Partial-P | No gap-N |
| अ | निविष्ठा | | | | |
| १ | बि याणे | | | | |
| २ | बिज प्रक्रिया | | | | |
| ३ | रासायनिक खते | | | | |
| ४ | पिक संरक्षण | | | | |
| ब) | लागवड पध्दत | | | | |
| १ | बियाणे प्रमाण | | | | |
| २ | दोन ओळीतील अंतर | | | | |
| ३ | दोन रोपातील अंतर | | | | |
| ४ | पीकाच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित सिंचन देण्याबाबतचे ज्ञान | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

६) प्रात्यक्षिक आणि शेतीशाळेच्या लाभार्थी शेतकऱ्यांची यादी-

| अ.क्र | शेतकऱ्यांचे नाव | मोबाईल नंबर | स्त्री/पुरुष | सामाजिक प्रवर्ग (अजा/अज/ सर्वसाधारण) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |

| अ.क्र | शेतकऱ्यांचे नाव | मोबाईल नंबर | स्त्री/पुरुष | सामाजिक प्रवर्ग (अजा/अज/ सर्वसाधारण) |
|---|---|---|---|---|
| २० | | | | |
| २१ | | | | |
| २२ | | | | |
| २३ | | | | |
| २४ | | | | |
| २५ | | | | |
| २६ | | | | |
| २७ | | | | |
| २८ | | | | |
| २९ | | | | |
| ३० | | | | |

उपरोक्त पैकी अ.क्र. ---- च्या शेतकऱ्याच्या शेतावर शेतीशाळा आयोजित करण्यात येईल.

७) अनुदानातून वितरित करावयाच्या निविष्ठा

| अ.क्र. | निविष्ठा | प्रती एकर मात्रा | पुरवठा संस्था | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

८) रु. १०००/- प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठी ठरविण्यात आलेल्या संवेदनशील लागवड पध्दती (Critical practices)

i.

ii.

iii.

९) प्रकल्पात समाविष्ठ बाबी

| अ. क्र. | बाब | युनिट | प्रती युनिट किंमत | एकुण युनिट | एकुण खर्च | खर्चाचे स्त्रोत | | | | बाब कधी राबविणार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्मार्ट | आत्मा | अन्य योजना (योजनचे नाव) | शेतकरी हिस्सा | |
| १ | पीक प्रात्यक्षीक | संख्या | | | | | | | | |
| २ | शेतीशाळा | | | | | | | | | |
| ३ | प्रशीक्षणासह अभ्यास दौरा | | | | | | | | | |
| अ | राज्याअंतर्गत | | | | | | | | | |
| ब | राज्या बाहेरील | | | | | | | | | |
| ४ | सेंद्रीय प्रमाणीकरण | | | | | | | | | |
| ५ | गॅप प्रमाणीकरण | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | |

टिप – प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर खालील बाबी सादर कराव्यात

१०) प्रकल्पात आलेली सरासरी उत्पादकता (किलो/हे.) –

११) Control plot ची उत्पादकता (किलो/हे.) –

# प्रपत्र -२

## उपयोगिता प्रमाणपत्र

### (शेतीशाळेच्या खर्चा बाबत शेतीशाळा आयोजीत करणाऱ्या कर्मचाऱ्यांने अग्रीम समायोजनासाठी द्यावयाचे उपयोगिता प्रमाणपत्र)

प्रमाणीत करण्यात येते की, मला **मौजे** ............... **तालुका**................ येथील स्मार्ट प्रकल्पातील ...................... पिकाच्या खरीप/रब्बी/वार्षिक हंगामासाठी शेतीशाळा आयोजित करण्यासाठी **रु**................(अक्षरी रक्कम रु..................... ) इतका **प्रथम/व्दितीय** अग्रीम मिळाला होता. या अग्रीमातून मार्गदशाक सुचनेनुसार मी बाबनिहाय खर्च केलेल्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ. क्र. | घटक | खर्च मर्यादा (रक्कम रु.) | प्रथम अग्रीमामधून खर्च | व्दितीय अग्रीमामधून खर्च | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १) | विस्तार प्रकल्प अहवाल तयार करणे | ५०० | | | |
| २) | व्याख्यात्याचे ने-आण करण्यासाठीचा तसेच त्यांचे भोजन इ. अनुषंगीक खर्चासाठी शेतीशाळेचे आयोजन करणे. प्रती व्याख्याता प्रती वर्ग रु.१०००/- अधिकतम वर्ग संख्या ६ | ६००० | | | |
| ३) | शेती शाळेतील विद्यार्थी शेतकऱ्यांसाठी लेखन साहित्य, चहा-पान, नाश्ता देणे. प्रती वर्ग रु.१०००/- अधिकतम रु. ६०००/- | ६००० | | | |
| ४) | ज्या शेतकऱ्यांच्या शेतावर शेतीशाळा घ्यावयाची आहे त्या शेतकऱ्यास प्रोत्साहनपर अनुदान देणे. | ३००० | | | |
| ५) | यशोगाथा तयार करणे. | ५०० | | | |
| | **एकूण** | १६००० | | | |

वरीलप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र सादर.

दिनांक :-

स्वाक्षरी:- ......................

नाव :-...........................

पदनाम :- ..........................

सजा :- ..........................

# प्रपत्र -३

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

## मुल्यसाखळी विकास शाळा अंतर्गत सीबीओनिहाय सादर करावयाची माहिती वर्ष :-२०२२-२३ नियोजन

जिल्हा :-

| अक्र | तालुका | सीबीओचे नाव | गाव | पिक/पिकसमुह | FPCच्या जबाबदार एक BoDचा तपशील | | FPC च्या CEO/ Manager तपशील | | क्षेत्रीय कर्मचारी कृ.स. /बीटीएमचे नाव | | मं.कृ.अ. नाव | | सदर सीबीओला VCDS घटकांचे दिलेले लक्षांक | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नाव | मो. नं. | नाव | मो. नं. | नाव | मो. नं. | नाव | मो नं. | प्रात्यक्षिके | | शेती शाळा | | राज्यांतर्गत सहली | | राज्याबाहेरील सहली | | अंतरराष्ट्रीय सहली | | तांत्रिक कर्मचाऱ्यां साठी अंतरराष्ट्रीय दौरे | | इतर (GAP, Organic Certification ) | | एकूण | |
| | | | | | | | | | | | | | भौ | आ | भौ | आ | भौ | आ | भौ | आ | भौ | आ | भौ | आ | भौ | आ | भौ | आ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

# प्रपत्र-४

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

जिल्हा :- मुल्यसाखळी विकास शाळा – समुदाय आधारीत संस्थास्तरीय नियोजन वर्ष :- २०२२-२३

टिप :- *पिक प्रात्यक्षिके, शेतीशाळा, प्रशिक्षणासह सहली इ. घटकांमध्ये किमान ५०% महिलांना सहभागी करणे अनिवार्य आहे. जरी महिलांच्या नावे ७/१२ उतारा नसला आणि त्या शेतकरी कुंटूबातील असल्यास लाभ देता येईल याची कृपया क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नोंद घेवून कार्यवाही करावी. जिल्हयाच्या अनुसूचीत जाती व जमातीतील शेतकऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणात अनुसूचीत जाती व जमातीतील शेतकऱ्यांची लाभ देण्यासाठी निवड करणे आवश्यक आहे.*

लाभार्थी निवडीसाठी सीबीओची सभा दि. .........

| अ क्र | तालुका | सीबीओ नाव | बाजाराभिमुख पिक प्रात्यक्षिके लाभार्थी शेतकऱ्यांचा तपशील | | | | प्रशिक्षणासह सहली लाभार्थी शेतकऱ्यांचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नाव | महिला /पुरुष | प्रवर्ग (अ.जा./अ.ज. / सर्वसाधारण) | अल्प / अत्यल्प / इतर | नाव | महिला /पुरुष | प्रवर्ग (अ.जा./अ.ज./ सर्वसाधारण) | अल्प / अत्यल्प / इतर |
| | | | | | | | | | | |

- शेतीशाळा आयोजित केलेल्या शेतकऱ्याच्या नावासमोर “शेतीशाळा शेतकरी”असे लिहावे.

# प्रपत्र-५

## मुल्यसाखळी विकास शाळा घटकांचे पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी करावयाच्या तपासणीचे प्रपत्र

१) पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम :-

२) भेटीचा दिनांक :-

३) VCDS तपासणी केलेल्या सीबीओचे नाव/गाव :-

४) VCDS साठी निवडलेले पिक :-

५) हंगाम व वर्ष :-

६) कृषी विस्तार प्रकल्प आराखडा तयार केला आहे का? –

७) ज्या शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्लॉटची तपासणी केली त्याचा तपशील-

| अ. क्र. | शेतकऱ्यांचे नाव | निविष्ठा अपक्षीत परिमाणात व चांगल्या दर्जाच्या मिळाल्या का? | निविष्ठा वेळेत मिळाल्या का? | शेती शाळा नियमित होते का? | शेतीशाळेचे किती वर्ग झाले | पेरणीचे दोन रोपातील व ओळीतील अंतर योग्य आहे का? | अन्य critical practices चा अवलंब झाल आहे का? | अन्य निरिक्षणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

८) कंट्रोल प्लॉट निवडला आहे का? होय /नाही – निवडल्यास शेतकऱ्याचे नाव –

९) शेतीशाळा कोणत्या शेतकऱ्याच्या शेतावर होते? –

१०)शेतीशाळेच्या गुणवत्तेबाबत (नियमितपणा, उपस्थिती, व्याख्याते) १ ते १० पैकी किती गुण देणार? -------

(१० गुण सर्वोत्तम, ५ ते ९ समाधानकारक, १ ते ५ असमाधानकारक)

११)प्रात्यक्षीक प्लॉटची पीक परीस्थिती कंट्रोल प्लॉट पेक्षा / अन्य बिगर लाभार्थी शेतकऱ्यांपैक्षा चांगली आहे का?

१२)प्रशिक्षणासह **अभ्यास दौरे**

| अ.क्र. | प्रकार | दौरा कधी आहे | प्रस्तावित ठिकाण | दौरा झालेला असल्यास शेतकरी समाधानी आहेत/नाहीत |
|---|---|---|---|---|
| १ | राज्याअंतर्गत | | | |
| २ | राज्या बाहेरील | | | |

**१३)**सर्व प्रकारच्या तंत्रज्ञान अवलंबनाबाबत १ ते १० पैकी किती गुण द्याल ? ------------

(१० गुण सर्वोत्तम, ५ ते ९ समाधानकारक, १ ते ५ असमाधानकारक)

१४)क्षेत्रीय कर्मचाऱ्यास सूचना

(स्वाक्षरी)

पर्यवेक्षकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

प्रपत्र -६

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)

CBO/शेतकरी गटांचे (किमान ५० शेतकऱ्यांचा गट) GAP व सेंद्रीय शेती प्रमाणीकरण लक्षांक

| अ क्र | जिल्हा | शेतकरी गट प्रमाणीकरणाचे लक्षांक | | |
|---|---|---|---|---|
| | | GAP | सेंद्रीय शेती | एकुण |
| १ | ठाणे | २ | १ | ३ |
| २ | पालघर | ८ | १ | ९ |
| ३ | रायगड | ६ | १ | ७ |
| ४ | रत्नागिरी | १० | १ | ११ |
| ५ | सिंधुदुर्ग | १० | १ | ११ |
| | **ठाणे विभाग** | **३६** | **५** | **४१** |
| ६ | नाशिक | १० | १ | ११ |
| ७ | धुळे | ६ | १ | ७ |
| ८ | नंदुरबार | ६ | १ | ७ |
| ९ | जळगाव | १० | ४ | १४ |
| | **नाशिक विभाग** | **३२** | **७** | **३९** |
| १० | अहमदनगर | ८ | १ | ९ |
| ११ | पुणे | ६ | १ | ७ |
| १२ | सोलापूर | १० | १ | ११ |
| | **पुणे विभाग** | **२४** | **३** | **२७** |
| १३ | सातारा | २ | १ | ३ |
| १४ | सांगली | १० | १ | ११ |
| १५ | कोल्हापूर | २ | १ | ३ |
| | **कोल्हापूर विभाग** | **१४** | **३** | **१७** |
| १६ | औरंगाबाद | ८ | ४ | १२ |
| १७ | जालना | १० | ५ | १५ |
| १८ | बीड | ६ | ४ | १० |
| | **औरंगाबाद विभाग** | **२४** | **१३** | **३७** |
| १९ | लातूर | २ | ५ | ७ |
| २० | उस्मानाबाद | ६ | १ | ७ |
| २१ | नांदेड | ६ | ४ | १० |
| २२ | परभणी | २ | ५ | ७ |
| २३ | हिंगोली | २ | ५ | ७ |
| | **लातूर विभाग** | **१८** | **२०** | **३८** |
| २४ | बुलढाणा | २ | ५ | ७ |
| २५ | अकोला | ६ | ५ | ११ |
| २६ | वाशिम | २ | ५ | ७ |
| २७ | अमरावती | १० | १ | ११ |
| २८ | यवतमाळ | २ | ४ | ६ |
| | **अमरावती विभाग** | **२२** | **२०** | **४२** |
| २९ | वर्धा | ६ | ४ | १० |
| ३० | नागपूर | ६ | १ | ७ |
| ३१ | भंडारा | २ | १ | ३ |
| ३२ | गोंदिया | २ | १ | ३ |
| ३३ | चंद्रपूर | २ | १ | ३ |
| ३४ | गडचिरोली | २ | १ | ३ |
| | **नागपूर विभाग** | **२०** | **९** | **२९** |
| | **एकुण राज्य** | **१९०** | **८०** | **२७०** |

टिप :- उपरोक्त दिलेले लक्षांक सुचक असून मागणी व आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.